13-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/12/2025 10:49 PM Page 1



# जुनाट आंब्याच्या झाडाने घेतला दुचाकीस्वाराचा बळी

## चारचाकीतील चार प्रवासी बचावले | वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १२ :** मांद्रे येथील मधलामाज भागात सोमवारी सायंकाळी सुमारे पावणे पाचच्या सुमारास भले मोठे आंब्याचे झाड कोसळून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार विशाल कृष्णनाथ साळकर (वय ३५, रा. धुळेर, म्हापसा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान, झाड चारचाकीवरही कोसळले तरीही त्यातील चार प्रवासी सुखरूप बचावले. मात्र वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

झाड कोसळण्याची घटना घडली त्यावेळी विशाल साळकर हे हरमल मार्गे मांद्रे दिशेने दुचाकीवरून जात होते. त्याच वेळी मोरजीहून येणारी जीए ११ टी ५०३२’ ही चारचाकी समोरून येत होती. झाड अचानक कोसळल्यामुळे दोन्ही वाहनं त्याखाली अडकली. झाडाचा मोठा फांदीचा भार विशाल यांच्या डोक्यावर आल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना त्वरीत उपचारासाठी तुये येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.



या घटनेनंतर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. आग्निशामन दलाचे जवान, स्थानिक ग्रामस्थ व पंचायत सदस्यांच्या मदतीने झाड हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले. माजी सरपंच रोजा उर्फ मिंगेल फर्नांडिस आणि उपसरपंच संपदा आजगावकर आणि त्यांच्या पतीनी प्रत्यक्ष झाड तोडण्याच्या कामात मदत केली. उपसरपंच आजगावकर व माजी जिल्हा पंचायत सदस्य श्रीधर मांजरेकर हेही घटनास्थळी उपस्थित होते.

दरम्यान, अपघातानंतर स्थानिक आमदार जीत आरोलकर यांचे दोन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना मदत करण्याबरोबरच झाड हटविण्याच्या कामातही सक्रिय सहभाग घेतला. काही स्थानिकांनी सांगितले की, दुपारी दोनच्या सुमारास झाडातून कर कर असा आवाज येत होता. जर त्यावेळी संबंधित यंत्रणेला सूचना दिल्या गेल्या असत्या आणि रस्ता बंद केला गेला असता, तर ही दुर्घटना टळली असती, असेही मत व्यक्त झाले. विशाल साळकर यांना तातडीने वैद्यकीय मदतीची गरज असतानाही आपत्कालीन रुग्णवाहिका १०८ वेळेवर घटनास्थळी पोहोचली नाही. त्यामुळे त्यांना नागरिकांनी खासगी वाहनाने रुग्णालयात नेले. मात्र, वेळेवर उपचार मिळू न शकल्याने त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर मांद्रे परिसरात रस्त्यांच्या कडेने असलेल्या जुनाट, धोकादायक झाडांविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अशा झाडांच्या कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने अशा धोकादायक झाडांची पाहणी करून ती तोडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे. रस्त्याच्या कडे असलेली झाडे अनेकदा खाजगी जागेत असतात. झाडे कापण्यासाठी मालकांची परवानगी आवश्यक असते. परवानगीशिवाय झाड कापल्यास न्यायालयीन कारवाई होऊ शकते. मात्र धोकादायक फांद्या छाटण्यास परवानगी आहे, असे आमदार आरोलकर यांनी स्पष्ट केले.

## निवडक

### कांपाल येथील बाल गणेश मंदिरचा वर्धापनदिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १२ :** कांपाल येथील बाल भवन जवळील श्री बाल गणेश मंदिर संस्थेत मंगळवार दि. १३ रोजी २७वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

यावर्षीच्या पूजेच्या सोहळ्याचे यजमानपद श्री. व सौ. वंदना शेखर हिरवे याला लाभले आहे. यानिमित्त सकाळी महा अभिषेक, धार्मिक विधी, श्री सत्यविनायक पूजा, दुपारी एक वाजता महाआरती, प्रार्थना, आशीर्वाद, तीर्थप्रसाद होईल. तसेच संध्याकाळी ६.३० वाजता भजन व रात्री ८वाजता श्री बाल गणेश मंडळातर्फे महाआरती होईल. तरी श्रींच्या सर्व भक्तगणांनी या मंगल सोहळ्यास आपल्या सहकुटुंब व मित्रमंडळीसह उपस्थित राहून श्रींच्या कृपा आशीर्वादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराच्या समितीतर्फे करण्यात आले आहे.

### हरमल भागात वीजेचा लपंडाव; नागरिकात संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १२ :** येथील भागात भूमिगत वीजपुरवठा होऊन सुद्धा वीजपुरवठा वांरवार खंडीत होत, असल्याने ग्राहकांच्या तक्रारी वाढल्या असून खास शटडाऊन घेऊनही रात्री अपरात्री वीज खंडित होण्याच्या घटना टळल्या नसल्याने ग्राहकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गेल्या आठवड्यात वीज खात्याने मॉन्सून पूर्व कामे उरकली असे मानल्यास काल ११ रोजी रात्री तीन वेळा खंडित होण्याची कारणे काय असू शकतात, हा सवाल आहे. पुन्हा पहाटे व सकाळी पुन्हा अर्धा एक तास खंडित झाल्याने खूपच गैरसोय झाली. सद्या उकाड्याने जनता त्रस्त असून, खंडित पुरवठा होऊ लागल्याने बेहाल झाले आहे. तशात फॅन,एसी वगैरे चालू असतात व वीज गुल होते व पुन्हा पुरवठा सुरू होतो, मात्र उच्च दाबाचा झाल्यास विजेवरील यंत्रणा निकामी होण्याची भीती असते.ती नुकसानी झाल्यास कोण भरून देईल,असे मत ग्रामस्थ डॅनियल कोस्टा यांनी व्यक्त केले.

ह्या भागात वीज पुरवठा खंडित केल्यास दुग्धजन्य पदार्थाची नासाडी होत असते.ती नुकसानी होऊ नये ह्यासाठी वीज खात्याने चार पाच दिवस आधीच माहिती देणे आवश्यक आहे.जेणेकरून माल कमी घेण्याची संधी असते.

पुरवठ्याच्या बाबतीत स्लो मात्र विजेचे दर वाढवण्यासाठी फास्ट अशी खात्याची स्थिती आहे.बड्या कंपन्या व उद्योजकांच्या फायद्यासाठी योजना राबवून त्या लॉबीस खुश ठेवण्याचा प्रयत्न होत आहे,ह्याचे भान सामान्य गरीब कुटुंबांना आहे.बड्या धेंड्याना कर्जमाफी व गरीब कुटुंबांना वीज जोडणी तोडण्याच्या नोटिसा, याचा उबग आला असून ,वीज दरवाढ अन्याय असून बड्या उद्योजकांना एकरकमी सवलत कशासाठी असा सवाल गृहिणींनी केलं आहे. तरी वीज खात्याने याबाबतीत सजगता दाखवून ग्राहकांना नुकसानी न करता,त्यांना सुरळीत पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी होत आहे

### वेळगे बाजार ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १२ :** वेळगे बाजार वीज ट्रान्सफॉर्मरवर मंगळवार दि. १३ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने वेळगे बाजार, सावरीभाट वेळगे या परिसरात वरील वेळेत वीजपुरवठा असणार नाही. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शिरवडे भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२ :** टेक्षेरा आणि निरंकार टीसीवर तांतडीचे दुरुस्ती काम करावयाचे असल्याने दि. १४ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिरवडे, टेक्षेरा आणि सभोवतालच्या भागात वीजपुरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाने दि. १४ रोजी ११ केव्ही ध्रमापूर फिडरवर तांतडीचे दुरुस्ती काम करावयाचे असल्याने सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत ड्रमापूर, सरझोरा आणि वेळी मतदारसंघातील शिरली भागात वीजपुरवठा केला जाणार नाही.

### अडवलपाल फीडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२ :** १३ मे २०२५ रोजी ११ केव्ही अडवलपाल फीडरवर तातडीचे दुरुस्ती काम करावयाचे असल्याने सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत अडवलपाल गाव, मोयते गाव, असणोरा प्रकल्पाजवळ आणि सभोवतालच्या भागात वीज पुरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे, १३ मे २०२५ रोजी नागझरवाडा फिडरवर तांतडीचे दुरुती काम करावयाचे असल्याने सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नागझरवाडा, मारडोलकर हॉस्पिटल आणि सभोवतालच्या भागात वीज पुरवठा केला जाणार नाही.

### प्रोग्रेस हायस्कुलतर्फे बाजार दिन उत्साहात साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड



**साखळी : प्रोग्रेस हायस्कुलच्या बाजार दिन कार्यक्रमात विक्री करताना विद्यार्थी.**

**साखळी, दि. १२ :** साखळी येथील प्रोग्रेस हायस्कुलतर्फे बाजार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना व्यापार, व्यवसाय, खरेदी विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव यावा तसेच व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने या बाजार दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी, भाजी, नारळ, खाद्यपदार्थ व जीवनावश्यक वस्तूंची विक्री केली. यावेळी पालकांनी विद्यार्थ्यांनी विक्रीस ठेवलेल्या वस्तूंची खरेदी करून मुलांना प्रोत्साहन दिले.शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध वस्तूंचे स्टॉल लावले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# पणजी महापालिकेकडून ’सेफ्टी फर्स्ट’ मोहीम सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२ :** पणजी शहर महानगरपालिकेने सोमवारी सेफ्टी फर्स्ट: महिला सक्षमीकरण आणि मुलांचे संरक्षण’ ही महत्त्वाकांक्षी मोहीम औपचारिकपणे सुरू केली. या मोहिमेचा उद्देश म्हणजे शहरातील महिला आणि बालकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत समाजामध्ये सुरक्षिततेविषयी जागरूकता वाढवणे आणि सर्व स्तरांवर सहभाग सुनिश्चित करणे.

गोवा पोलिस आणि स्वयंसेवी संस्था स्कॅन–गोवा यांच्या सहकार्याने राबवण्यात येणारी ही मोहीम नागरिकांना सुरक्षिततेसंबंधी माहिती देणे, त्यांना सजग बनवणे आणि या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेणे, या तीन प्रमुख टप्प्यांवर आधारित आहे.

मोहिमेच्या अनुषंगाने संपूर्ण शहरभर तसेच स्थानिक सार्वजनिक वाहतुकीत – विशेषतः बसगाड्यांमध्ये – ठळक आणि माहितीपूर्ण होर्डिंग्ज, स्टिकर्स लावण्यात येणार आहेत. या माध्यमातून महिला व मुलांच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन, उपयुक्त संपर्क क्रमांक, तसेच उपलब्ध सुविधा यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवली जाईल. गोवा पोलिसांच्या सहकार्याने, बसगाड्यांमध्ये सध्या सामान्य वेषातील पोलिस कर्मचारी तपासणी करत आहेत. हे अधिकारी महिला व बाल प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बसमधूनच प्रवास करून प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही उपाययोजना विशेषतः महिलांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मोहिमेच्या दृश्य माध्यमांमध्ये सर्व वयोगटातील नागरिकांना आकर्षित करण्यासाठी आकर्षक रंगसंगती, संक्षिप्त पण प्रभावी संदेश यांचा वापर करण्यात आला आहे. उच्च रहदारी असलेल्या परिसरांमध्ये , जसे की पणजी बसस्थानक, मिरामार, बाजार प्रवेशद्वारे, डी बी रोड, १८ जून रोड आदी ठिकाणांवर आधारित होर्डिंग्ज उभारण्यात आली आहेत. तसेच शाळा, सामुदायिक केंद्रे, स्थानिक व्यावसायिक ठिकाणी स्टिकर्स वितरित केले जात आहेत.

प्रत्येक माहिती फलकावर अत्यावश्यक संपर्क क्रमांक, स्थानिक सहाय्य सेवांची माहिती, तसेच भविष्यातील सामुदायिक सुरक्षा शिबिरांची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे. या मोहिमेचा उद्देश केवळ माहितीप्रद जागरूकता निर्माण करणे नसून, एक जबाबदार आणि परस्पर सहकार्य करणारे समाजाचे चित्र तयार करणे हाही आहे.

मोहिमेचा पहिला टप्पा आता प्रत्यक्ष अंमलात आणण्यात आला असून, बाल भिकेच्या संदर्भातील माहिती व हेल्पलाइन नंबरसह होर्डिंग्ज विजेच्या खांबांवर लावण्यात आले आहेत. या मोहिमेअंतर्गत लवकरच विविध शैक्षणिक कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे, जनजागृती कार्यक्रम आणि समुदायाला सहभागी करून घेणारे उपक्रमदेखील आयोजित केले जाणार आहेत. त्यातून गंभीर सुरक्षा प्रश्नांबद्दल सखोल चर्चा होणार असून, यासंबंधी उपाययोजना प्रत्यक्षात उतरवण्यात येणार आहेत.

# राय उपसरपंचांविरोधात अविश्वास प्रस्ताव

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १२ :** राय गाव पंचायतीतील सत्ताधारी गटात राजकीय वादळ निर्माण झाले असून, उपसरपंच गॉडफ्रे ओसवर्ड सूझा यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. अकरा सदस्यांपैकी सहा सदस्यांनी या प्रस्तावावर स्वाक्षरी करून सूझा यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

या प्रस्तावावर स्वाक्षरी करणाऱ्यांमध्ये अँटोनियो झेवियर फर्नांडिस, मॅन्युएल रॉड्रिग्ज, जुडास क्राड्रोस, मिंग्वेलिना डिसोझा, क्रीन डी’कुन्हा ई डि’कोस्टा आणि पीटर क्राड्रोस यांचा समावेश आहे. या राजकीय घडामोडींमुळे पंचायतीतील सत्तासंघर्ष समोर आला आहे.

विशेष म्हणजे, या सत्ताधारी गटातून अचानक बाहेर पडत विरोधी भूमिका घेणाऱ्या पीटर क्राड्रोस यांच्या निर्णयामुळेच ही हालचाल वेगाने घडून आल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

याबाबत पीटर क्राड्रोस यांनी स्पष्ट केले की, मी सत्ताधारी गटाचा सक्रिय सदस्य असूनही, माझ्याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. मी पंचायतीच्या नियमित बैठका घेण्यात येत नसल्याच्या विरोधात आवाज उठवला होता, पण मला दुर्लक्षित करण्यात आले. गावाच्या हितासाठी मी काम केले, पण मला ना योग्य आदर मिळाला ना पाठिंबा.

या आरोपांवर प्रत्युत्तर देताना उपसरपंच गॉडफ्रे सूझा म्हणाले की,, माझ्या विरोधात प्रस्ताव मांडणाऱ्यांविषयी मला कोणताही वैयक्तिक राग नाही. मी नेहमीच पंचायतीतील भ्रष्टाचाराविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. कदाचित याच भूमिकेमुळे काही सदस्य नाराज झाले असावेत. झेवियर फर्नांडिस यांच्यासह इतर सदस्यांनी सूझा यांच्यावर प्रशासकीय दुर्लक्षाचे आरोप करताना सांगितले की, उपसरपंचांनी पंचायतीच्या आदेशानुसार तपासणी केली नाही. शिवाय, निर्णय घेताना इतर सदस्यांचा सल्ला घेण्यात ते अपयशी ठरले.

प्रस्तावात सूझा यांच्यावर एकतर्फी निर्णय घेण्याचा तसेच सामूहिक सहभागाची कमतरता असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे पंचायतीचे संघशक्तीवर आधारित प्रशासन धोक्यात आल्याचे सदस्यांचे मत आहे.संबंधित अविश्वास प्रस्ताव लवकरच मांडला जाणार असून, त्याचा परिणाम राय पंचायतीच्या नेतृत्वावर आणि पुढील प्रशासकीय कामकाजावर होण्याची शक्यता आहे.

# गोव्यात दिव्यांगांसाठी सर्वसमावेशक सर्वेक्षण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२ :** राज्यातील सर्व दिव्यांग नागरिकांचा समावेश करून त्यांचा अचूक व अद्ययावत डेटा संकलित करण्यासाठी गोवा सरकार एक व्यापक सर्वेक्षण राबविणार आहे . समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई यांनी सोमवारी याबाबत घोषणा केली.

फळदेसाई म्हणाले की, समाजकल्याण विभाग आणि राज्यातील दिव्यांग व्यक्तींसाठीचे आयुक्त कार्यालय संयुक्तपणे हे सर्वेक्षण हाती घेतील. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे अपंग नागरिकांसाठी प्रभावी धोरणे आखण्यासाठी आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी योग्य माहिती उपलब्ध करणे हा आहे. सध्या आपण २०११ च्या जनगणनेतील अपूर्ण डेटावर अवलंबून आहोत, ज्यात केवळ सात प्रकारच्या अपंगत्वाचा समावेश आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे सांगितले की, अपंग व्यक्तींचे हक्क कायदा, २०१६ अंतर्गत होणाऱ्या या सर्वेक्षणात आता २१ प्रकारच्या अपंगत्वांचा समावेश केला जाणार आहे. तसेच, सुमारे १०० मापदंडांनुसार माहिती संकलित केली जाईल. गोवा हे देशातील पहिले राज्य असेल जे अशा प्रकारचा सखोल सर्वेक्षण उपक्रम राबवत आहे. या माध्यमातून सर्व पात्र दिव्यांग नागरिकांना ओळखून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी योजना तयार करता येतील. या कार्यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि पुढील दोन महिन्यांत एजन्सी नियुक्त केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

सर्वेक्षणाची अंमलबजावणी घरोघरी जाऊन केली जाणार असून, नाव, गाव, शैक्षणिक पात्रता, अपंगत्वाचा प्रकार, वार्षिक उत्पन्न आदी तपशील नोंदवले जातील. या डेटामध्ये जिओ–टॅगिंगची सुविधाही असणार आहे, असे फळदेसाई यांनी नमूद केले.

राज्य अपंग आयुक्त गुरुप्रसाद पावसकर यांनी सांगितले की, सध्याच्या सात अपंगत्व प्रकारांऐवजी आता २१ प्रकार समाविष्ट केल्यामुळे गोव्यातील दिव्यांगांच्या नोंदीत चार ते पाच पट वाढ होण्याची शक्यता आहे. आम्ही विविध नवीन योजना राबवण्याचा प्रयत्न करत आहोत, आणि त्यासाठी आमच्याकडे सुस्पष्ट माहिती असणे अत्यावश्यक आहे.

दरम्यान, समाजकल्याण विभागाने जाहीर केले आहे की, येत्या २० मे ते २ जून २०२५ या कालावधीत राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये मूल्यांकन शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमधून पात्र लाभार्थ्यांची निवड करून त्यांना एडीआयपी योजनेअंतर्गत मोफत सहाय्यक साधने व उपकरणे वितरित केली जातील.

# ‘माझी बस’ योजना सुरूच ठेवा

## अन्यथा प्रवाशांसह बस मालक अडचणीत | बस मालक संघटनेची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १२ :** १७ आगस्ट २०२३ रोजी सुरू करण्यात आलेली गोवा सरकारची ‘माझी बस’ योजना यापुढेसुद्धा सरकारने चालूच ठेवावी. अन्यथा प्रवाशांसह बस मालक सुद्धा अडचणीत सापडणार आहेत. अशी मागणी आज दि.९ रोजी, काणकोण कदंब बस स्थानकावर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत काणकोण बस मालक संघटनेचे पदाधिकारी व अन्य सदस्यांकडून मागणी करण्यात आली आहे.

गोवा सरकारच्या प्रस्तावावर १० जुलै २०२३ रोजी सविस्तर व व्यापक चर्चेनंतर माझी बस योजना बस मालक संघटनेकडून मान्य करण्यात आली होती. १७ आगस्ट २०२३ पासून ही योजना सुरू झाली होती. या योजनेनुसार प्रती कि.मी.३४ रु. वेळच्या वेळी बस मालकाना मिळत आहेत. सर्वप्रकारचे शुल्क व अन्य खर्च यामध्ये भागवून आपण ना नफा, ना तोटा या तत्वावर चालवत आलेलो आहोत, असे ॲन्थोनी पेरेरा यांनी सांगितले.



**काणकोण : माझी बस योजने संदर्भात पत्रकार परिषदेत माहिती देताना काणकोण बस मालक संघटनेचे अध्यक्ष ॲन्थोनी पेरेरा, नाईक भिकर, संदीप देसाई, विशाल देसाई, कौतुक देसाई व इतर.**

या योजनेनुसार बस वाहक कदंब महामंडळाचा असतो. ते शिकलेले असल्यामुळे पुर्वीच्या वागणूकी संदर्भात तक्रारी प्रवाशांकडून नव्हत्या. तसेच प्रवाशांना मिळणाऱ्या सवलतीचा लाभ दिला जात आहे. रस्त्यावर प्रवांसी मिळवण्यासाठी होणारी स्पर्धा नाही कि बस वाहनांमध्ये होणारी बाचाबाची, भांडणे संपुष्टात आली होती. मात्र हल्लीच कदंब महामंडळातर्फे एक जाहिर सुचनापत्र काढून १६ मे पासून ही योजना संपुष्टात येईल असे कळविण्यात आले आहे. असे झाल्यास या योजनेचा भाग असलेले बस मालक, बस वाहक यांना कठीण प्रसंगाचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे ही योजना सरकारने बंद करण्याच्या निर्णयावर फेरविचार करावा, अशी मागणी काणकोण बस मालक संघटनेचे अध्यक्ष एन्थोनी पेरैरा यांनी केली.

काणकोणातील ४६ तसेच सावर्डे, फोंडा या भागातील एकूण ५७ बसी दक्षिण गोव्यातील विविध रस्त्यावर धावताना. काणकोणातील दुर्गम भागातील नागरिकांनाही या योजनेचा लाभ होत आहे. सर्व प्रथम काणकोण ते मडगाव या मार्गावर या योजनेतूनच बस सुरू होऊन नंतर ५६ बस मालक या योजनेत सामील झाले होते. सर्व काही सुरळीत सुरू असताना उत्तर गोव्यातील एक मोठा बस मालक, माझी बस योजना बंद करून पूर्वीची अन्य एक योजना सुरू करण्यासाठी दबाव आणत आहे. आम्ही यासंदर्भात मुख्यमंत्री व अन्य संबंधिताची भेट घेतली आहे. आमच्या मागणीवर सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल,असे आश्वासन आम्हाला देण्यात आले आहे. असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

यावेळी काणकोण बस मालक संघटनेचे अध्यक्ष एन्थोनी पेरैरा, पुजारी नाईक भिकर, संदीप देसाई, विशाल देसाई, कौतुक देसाई व अन्य सदस्य उपस्थित होते.